# सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना

**अ. प्रस्तावना :** भारतासारख्या खंडप्राय व शेतीप्रधान देशामध्ये साक्षरता दर मुळातच ५०% च्या आसपास आहे. त्यातही मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण चिंताजनक म्हणावे एवढे कमी आहे, एका बाजुला कल्पना चावला, किरण बेदी, लता मंगेशकर, पी. टी. उषा यासरखी उत्तुंग महिला व्यक्तीमत्त्वे तर दुसरीकडे चुल आणि मुल या दुष्टचक्रात अडकलेल्या ग्रामीण भागातील कोट्यावधी निरक्षर स्त्रिया. अशा फार मोठ्या सामाजिक विषमता असलेल्या आपल्या देशातील महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असले तरी स्त्रीशिक्षणाच्या पार्श्वभूमीवरील येथील चित्र फारसे आल्हाददायक नाही. निम्म्यांपेक्षा जास्त मुली शाळेची पायरी चढत नाहीत. त्यातील काही मोजक्या मुली महाविद्यालयीन शिक्षण घेतात व त्यातील खरोखरच बोटावर मोजता येतील अशा थोड्याफार मुली विविध क्षेत्रामध्ये चमकतांना दिसतात. घरची परिस्थिती, दारिद्रय, रुढी-परंपरा, समाजातील अपसमज अशी काहीही कारणे असो मुलींच्या शिक्षणाबाबत अजूनही पुरेशा सकारात्मक भावनेने पाहिले जात नाही ही दूर्देवाने वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच वैद्यकीय शिक्षणासारख्या महागड्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतांना मुलींच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर भेदभाव केला जातो हेही दुदैवाने खरे आहे. अशा वेळी किमान काही हुशार व गरजू मुलींच्या शिक्षणांस हातभार लागावा या हेतुने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाद्वारे सावित्रीबाई फुले मुलींसाठी शिष्यवृत्ती योजना आखण्यात आली आहे.

स्वातंत्र्यपुर्व काळामध्ये भारतातील तथाकथीत परंपरा, रुढी, जातीयवाद, स्त्रीला हिन लेखण्याची वृत्ती या सर्व बाबींमुळे स्त्रीयांच्या शिक्षणाबाबत विचार करणे देखील कठीण होते. अशा वेळेला १४ जानेवारी १८४८ रोजी महात्मा ज्योतीराव फुले यांनी सुरु केलेल्या मुलींच्या शाळेत सावित्रीबाई भारताच्या पहिल्या महिला



शिक्षिका ठरल्या. रुढीवादी मनोभूमिकेमुळे या कन्याशाळेत शिकवायला पुरुष तयार होईना परंतू सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाची पेटवलेली ज्योत काही विझवू दिली नाही. सावित्रीबाईंनी मुलींना परंपरागत शिक्षणाबरोबरच अंधश्रद्धा व घातक रुढीबरोबर लढा देण्याचे व सर्वांगीण व्यक्तीमत्त्व विकासाचे प्रशिक्षण दिले. अशा प्रकारे स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सावित्रीबाईनी समाजातील स्त्रियांच्या सबलीकरण (Empowerment of Women) व वंचितासाठी शिक्षण (Education for Deprived) या दोन संकल्पनांसाठी आपले आयुष्य वेचले. त्यामुळेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विविध शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी असलेल्या या शिष्यवृत्ती योजनेचे नामकरण **'सावित्रीबाई फुले मुलींसाठी शिष्यवृत्ती योजना'** असे करण्यात आले आहे.

सदर नामकरणामुळे सावित्रीबाईनी लावलेली स्त्री शिक्षणाची ज्योत तेवत राहण्यासाठी या विद्यापीठाद्वारे त्यांना आदरांजली अर्पण केली जाईल असा विचार व्यवस्थापन परीषदेच्या बैठकीत डॉ. गजानन र. एकबोटे यांनी मांडला. अधिसभेच्या बैठकीतही श्री. राजेश पांडेसह सर्वच सदस्यांनी या संकल्पनेचे स्वागत केले व उपयुक्त सुचना केल्या. मा. कुलगुरु - डॉ. मृदुला फडके यांनी या सुचनेस सक्रिय प्रतिसाद दिला व त्याप्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतुद केली.

आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे विद्यार्थी हे उच्च शैक्षणिक क्षमता असलेले विद्यार्थी असतात. या अभ्यासक्रमाचा खर्च भरमसाठ वाढला आहे. त्यामुळे एखादी हुशार विद्यार्थिनी केवळ ऐपत नाही किंवा परवडत नाही म्हणून वैद्यकीय शिक्षणापासुन वंचित राहू नये या हेतूने काही गरजू विद्यार्थीनींना हे शिक्षण घेण्यासाठी मदत व्हावी म्हणून महाराष्ट्र आरोग्य विद्यान विद्यापीठाने ही योजना शैक्षणिक वर्ष २००८ - २००९ पासुन सुरु केली. या योजनेच्या माध्यमातून आरोग्य विज्ञानाच्या विविध विद्याशाखांमध्ये प्रवेश घेणाऱ्या पात्र व गरजु विद्यार्थीनींचे काही प्रमाणात शैक्षणिक शुल्क विद्यापीठाद्वारे भरण्यास मदत होईल अशा स्वरुपाची ही योजना आहे.

## ब. वैशिष्ट्ये :

१. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांतील पदवीपूर्व अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीसाठी लागु.

२. टप्प्यानुसार विविध गटांना लागु करावी. टप्पे पुढीलप्रमाणे -
अ. महाविद्यालय प्रकारानुसार वर्गीकरण -
(१) शासकीय व अनुदानित महाविद्यालयामधील प्रवेश.
(२) विनाअनुदानित महाविद्यालयामधील मेरीट कोट्यामधील प्रवेश.
ब. उत्पन्न गटानुसार वर्गीकरण -
(१) दारिद्रय रेषेखालील गट.
(२) निराधार गरीब विद्यार्थीनी.
(३) आर्थिक दृष्ट्या मागासवर्ग गट.

## क. स्वरुप :

१. योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थीनीची शैक्षणिक प्रगती ही समाधानकारक असली पाहिजे. त्यासाठी तिने प्रतीवर्षी उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. विद्यार्थिनी एखाद्या वर्षी अनुत्तीर्ण झाल्यास त्या वर्षाचे अनुदान मिळणार नाही व त्यापुढील शैक्षणिक वर्षामध्ये अनुदान मिळण्यास पात्र रहाणार नाही.

२. योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थींना मिळावा म्हणून अर्जदार विद्यार्थीनीस मंजूर करावयाच्या अनुदानाची रक्कम ठरविण्याचा अधिकार विद्यापीठ राखुन ठेवीत आहे.

३. एन. आर. आय. / ओ. एम. एस. / उच्च उत्पन्न (Creamy Layer) गटातील प्रवेशित विद्यार्थीनींना सदर योजनेचे लाभ मिळणार नाहीत.

४. अधिष्ठाता / प्राचार्यांनी शिफारस करतांना खरोखरच गरीब व गरजु अशा फक्त दोन विद्यार्थीनींचे अर्ज विद्यापीठाकडे पाठवावयाचे आहेत याची कृपया नोंद घ्यावी.



## ड. कार्यप्रणाली :

१. दरवर्षाच्या सप्टेंबर महिन्यात (प्रवेश प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर) महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी योजनेची प्रसिद्धी व परीपत्रक प्रदर्शित करावे व इच्छुक विद्यार्थिनींकडून अर्ज मागवावे.

२. महाविद्यालय स्तरावर प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन खरोखर गरजु व मदत आवश्यक असलेल्या दोन विद्यार्थिनींचे अर्ज प्राचार्यांनी स्वत:च्या शिफारशीसह विहीत मुदतीत विद्यापीठास पाठवावेत.

३. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची पात्र / अपात्र व गरजक्रमानुसार चढत्या क्रमाने यादी तयार करण्यात येईल. सदर यादी मधील सर्वाधिक गरीब व गरजु विद्यार्थीनीस प्राधान्य या तत्वाने अनुदान संपेपर्यंत चढत्या क्रमाने शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात येईल.

४. सदर यादी सर्व सहपत्रांसह विद्यार्थी कल्याण सल्लागार मंडळापूढे सादर करण्यात येईल व मंडळाने शिफारस केलेल्या विद्यार्थीनींना या योजनेचा लाभ मिळेल असे कळविण्यात येईल.

५. विद्यार्थी कल्याण मंडळास आवश्यक वाटल्यास प्रस्तावित लाभार्थी विद्यार्थिनीचा प्रस्ताव तपासण्यासाठी मा. सदस्य व अधिकाऱ्यांची समिती नेमण्यात येईल व समितीच्या अहवालाच्या आधारे शिष्यवृत्ती वाटप करण्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात येईल.

## इ. अटी व शर्ती

१. विद्यापीठाशी सलंग्नित असलेल्या महाविद्यालयातील हुशार,गरीब व नियमित विद्यार्थिनींकरीता लागू

३. भारताबाहेरील **(NRI)** व महाराष्ट्राबाहेरील **(OMS)** विद्यार्थीनींकरीता लागू नाही.

४. सदर योजनेतील लाभार्थी ठरविण्यासाठी आर्थिक दृष्टया मागास घटकांचा विचार करण्यात येईल. इतर बाबी समान असल्यास मागासवर्गीय विद्यार्थिनीस प्राधान्य देण्यात येईल.

२. पदवी पूर्व शिक्षण घेणाऱ्या **(UG)** विद्यार्थिनींकरीता लागू

५. पालकांचे वार्षिक उत्पन्नाबाबतचा दाखला ग्राह्य धरतांना सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने (तहसिलदार) दिलेला अलीकडचा उत्पन्नाचा दाखला / फॉर्म १६ ची प्रत आवश्यक आहे.

६. गतवर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेच्या गुणपत्रकाची प्रत जोडावी

७. **REPEATER** विद्यार्थीनीस योजनेचा लाभ मिळणार नाही.

८. विद्यार्थी मागसवर्गीय असल्यास, जातीचा दाखला जोडावा.

९. प्रस्तावसोबत जोडलेली सर्व सहपत्रे राजपत्रीत अधिकाऱ्यांकडुन सांक्षाकित केलेले असावे.

१०. अर्ज विहीत नमुन्यात (नमुना **II, III, IV**) अधिष्ठाता / प्राचार्यामार्फत व त्यांच्या सही शिक्क्यांनिशी असणे आवश्यक आहे. तसेच सोबत जोडलेली प्रमाणपत्रे / सर्व सहपत्रे साक्षांकित केलेली असावी.

११. विद्यार्थीनीस भारत सरकार / महाराष्ट्र शासन किंवा अन्य संस्थाकडून अनुदान / विद्यावेतन /शिष्यवृत्ती किंवा फी माफ होत असेल तर अशा विद्यार्थीनीस सदर योजनेचा लाभ मिळणार नाही.

१२. विहीत नमुन्यात नसलेले, अपूर्ण व साक्षांकित नसलेले, प्राचार्यांच्या मार्फत न आलेले तसेच निर्धारित मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज फेटाळले जातील.

१३. एखाद्या विद्यार्थीनीने खोटे कागदपत्रे सादर करुन लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थीनीस वाटप केलेले सर्व अनुदान व्याजासह वसुल करण्यात येईल व योग्य त्या शिस्तभंगाच्या कारवाईसाठी ती पात्र असेल यांची नोंद घेण्यात यावी.

१४. कोणतेही कारण न देता योजनेबाबत निर्णय घेण्याचे, अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

१५. योजनेचे लाभार्थी ठरविण्या बाबत विद्यापीठाने / विद्यार्थी कल्याण मंडळाने घेतलेला निर्णय अंतीम असेल.

❊ ❊ ❊ ❊ ❊



## नमुना - I

### सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना
### विद्यार्थीनीने करावयाच्या अर्जाचा नमुना

| विद्यार्थिनीचा पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

प्रति,
**मा. संचालक - विद्यार्थी कल्याण विभाग,**
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.

महोदय,

आपल्या विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले मुलींसाठी शिष्यवृत्ती योजनेत उपलब्ध असलेले अनुदान मिळावे म्हणून मी इच्छूक असून कृपया योजनेत सहभागी करुन घ्यावे ही नम्र विनंती. माझी सविस्तर माहिती सोबतच्या नमुन्यात देत आहे.

सदर योजने अंतर्गत मला अनुदान मंजुर झाल्यास विद्यापीठाच्या / योजनेच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास आमची तयारी आहे.

| | |
|---|---|
| सही : | सही : |
| विद्यार्थिनीचे नांव | पालकाचे नांव : |
| स्थळ : | दिनांक : / / २०० |

नमुना - **II**

## माहिती अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | विद्यार्थीनीचे संपूर्ण नांव | |
| २. | कायम निवासी पत्ता व दुरध्वनी / मोबा. क्र. | |
| ३. | सध्याच्या पत्ता व दुरध्वनी / मोबा. क्र. | |
| ४. | जन्म तारीख व वय | |
| ५. | सध्या शिकत असलेला वर्ग | |
| ६. | गतवर्षी उत्तीर्ण वर्ग व श्रेणी (गुणपत्रक जोडावे) | |
| ७. | मागासवर्गीय असल्यास प्रकार (दाखला जोडावा) | होय / नाही वर्गवारी :- |
| ८. | वडीलांचे / पालकाचे संपूर्ण नाव व पत्ता | |
| ९. | पालकांशी विद्यार्थीनिचे नाते | |
| १०. | घरचा दुरध्वनी व मोबाईल नंबर | |
| ११. | पालकाचा व्यवसाय / नोकरी | |
| १२. | वार्षिक उत्पन्न (दाखला जोडावा) | |
| १३. | नोकरी / व्यवसायाचा पत्ता | |
| १४. | कार्यालय दुरध्वनी (एस.टी.डी.कोडसह) | |
| १५. | महाविद्यालयाचे नांव | |
| १६. | महाविद्यालयाचा पत्ता | |
| १७. | प्राचार्याचे नाव व दुरध्वनी क्रमांक | |
| १८. | कोर्सचे नांव व कालावधी | |
| १९. | कोर्ससाठी प्रवेश घेतल्याचा दिनांक | |
| २०. | कोर्स उत्तीर्ण होण्याचा संभाव्य दिनांक | |

विद्यार्थीनिची सही पालकाची सही अधिष्ठाता / प्राचार्य

स्थळ : दिनांक : / / २००

**टिप :**

१. प्रत्येक महाविद्यालयाने प्राधान्यक्रमाने फक्त दोनच विद्यार्थीनींची नावे कळवावी.

२. वरील नमुद केलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुनच शिष्यवृत्ती देण्याबाबत प्राचार्यांनी शिफारस करावी.



नमुना - **III**

## - विद्यार्थीनीचे हमीपत्र (सुधारीत) -

| क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १. | विद्यार्थीनीचे नाव | |
| २. | कायम रहिवासी पत्ता | |
| ३. | शिकत असलेले वर्ष | |
| ४. | अभ्यासक्रम | |
| ५. | विद्यार्थीनीची जात | |
| ६. | विद्यार्थीनीच्या जातीचा प्रवर्ग (SC/ST/VJNT/OBC/OPEN/Any Other) | |
| ७. | विद्यार्थीनीने शिक्षणासाठी प्रवेश घेतल्याचे माध्यम (NRI/Management/MH-CET/CBSE/Any other quota) | |

मी सत्यप्रतिज्ञेशवर असे लिहून देते की, मला २०० - २०० या शैक्षणिक वर्षाकरीता भारत सरकार / महाराष्ट्र शासन अथवा इतर संस्था यांच्याकडून पुढील फायदे मिळालेले आहेत / मिळणार आहेत.

| क्र. | शिक्षणासाठी मिळत / मिळणार असलेल्या सवलतींचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | शुल्क परतावा किंवा फि सवलत रक्कम | रु. |
| २. | शिष्यवृत्ती / फेलोशिप रक्कम | रु. |
| ३. | शिक्षण सहाय्य योजना रक्कम | रु. |
| ४. | भारत सरकार / महाराष्ट्र शासन अथवा इतर संस्था यांच्याकडुन रक्कम | रु. |

वर नमुद केलेल्या १ ते ४ पैकी शैक्षणीक शुल्क सवलतीसाठी संस्थेकडे / कार्यालयाकडे अर्ज दाखल केला असल्यास त्यासंबंधी सविस्तर माहिती खाली नमुद करावी.

...........................................................................................

...........................................................................................

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी, योजनेबाबत असलेल्या सर्व नियमांचे मी पालन करीन. या संदर्भात नियमात बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे असतील तसेच सदर अनुदान हे विद्यापीठ निधीतून सवलतीच्या स्वरुपात मिळत असुन तो माझा हक्क नाही याची मला जाणीव आहे. मी असेही जाहीर करते की, सदर अर्जात नमुद केलेली सर्व माहिती खरी आहे. ही माहिती खोटी असल्यास / तफावत आढळल्यास मी योग्य त्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र असेल.

पालकाची सही : विद्यार्थीनीची सही :

नाव : नाव :

स्थळ : दिनांक :

अधिष्ठाता / प्राचार्य यांची शिफारस व स्वाक्षरी

नमुना - **IV**

----------------------------------------

ON COLLEGE LETTER HEAD

----------------------------------------

## - दाखला -

दाखला देण्यात येतो की, श्रीमती / कुमारी ____________________ ____________________ ही आमच्या महाविद्यालयाची नियमीत विद्यार्थिनी असून ती सन २००   - २००   या शैक्षणिक वर्षात __________ ______________ (कोर्सचे नांव) या तीन / चार वर्षे कालावधींच्या प्रथम / द्वितीय / तृतीय / अंतीम वर्षात शिकत आहे. सदर विद्यार्थिनीची गुणवत्ता व वर्तणुक चांगली आहे. त्याचप्रमाणे ती गतवर्षी __________________ या शैक्षणिक वर्षात ______________ गुण मिळवुन उत्तीर्ण झाली आहे असे प्रमाणीत करीत आहे.

सदर विद्यार्थीनीस सावित्रीबाई फुले मुलींसाठी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळावा म्हणून मी शिफारस करीत आहे.

महाविद्यालयाचा शिक्का

अधिष्ठाता / प्राचार्य
सही व शिक्का



### आपल्या अर्जासोबत पुढील कागदपत्रे आहेत काय ?

१. प्राचार्यांचे शिफारस पत्र (नमुना - IV प्रमाणे)
२. विहीत नमुन्यातील अर्ज (नमुना - I प्रमाणे)
३. माहिती अर्जाचा नमुना (नमुना - II प्रमाणे)
४. विद्यार्थीनीचे हमीपत्र (नमुना - III प्रमाणे)
५. गतवर्षाचे साक्षांकीत गुणपत्रक.
६. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला.
७. जातीचा दाखला.
८. उच्च उत्पन्न गटात नसल्याबद्दलचा (Non Creamy Layer) दाखला.

### योजने बाबतच्या अधिक माहीतीसाठी कृपया खालील पत्यावर संपर्क साधावा

**संचालक विद्यार्थी कल्याण**
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२ ००४.

**- दुरध्वनी -**
०२५३ - २५३९१७०, २५३९१७२, २५३९१७३.

**- फॅक्स -**
०२५३ - २५३९१७१.

**- ई-मेल व संकेत स्थळ -**
sw@muhsnashik.com
schemes@rediffmail.com
www.muhsnashik.com

❋ ❋ ❋ ❋ ❋